REFBK-0019451
REFBK-0019451

# अफजुल-वधाचा प

ग ब० ग० खापर्डे ( उम

र", बनारस-हिंदु-युनिव्हर्सिटी.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. 220
ग १९३०



REFBK-0004246
REFBK-0004246

मुद्रक व प्रकाशक—कविभूषण बळवंत गणेश
" अरुण " छापखाना, उमरावती ( वऱ्हा

किंमत
दोन आणे.

( स

REFBK-0004246

## समर्पण.

( चाल १. )

माझं सुदाम्याच हे पव्ह, पाखडुनि खाव, कुठं न टोचाव । सुजनजन चतुराच्या टाळुला । शिवाजिच्या वंदीतों पावलां ।

पवाडा

अर्पीतों हा त्याला ॥

ब० ग० खापर्डे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
४२४६

# शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ५ | ३ | डोलतो | डुलतो |
| ६ | ११ | चालिले हो | चालिलासे |
| ९ | ८ | दीर्घ कांहीं | दीर्घ नाहीं |
| १० | १९ | देहच | देहचि |
| १३ | ८ | फळें | ही फळें |
| २८ | २२ | पुरे पुरे | पुरे पुरे हा. |
| ३९ | १२ | कुलाद्धोरही | कुलोद्धारही |
| ४० | ९ | विधान | निधान |
| ५५ | ६ | प्रथम शरण | प्रथम नमन |
| ५५ | ८ | नामस्मरण | रामस्मरण |
| ६० | २१ | रंजवी | रंगवी |

पान ८ ओळ १८ वी यामध्यें 'धर्ता हर्ता कोण तुजाविणें' असें म्हणावें.

पान ८ मध्यें पद ११ यांत ध्रु० चुकून पडलें आहे, तें त्या ठिकाणीं नको आहे.

पान २२ ओळ १८ वी यामध्यें 'पहिलें नाम गाइलें ग' हे शब्द जास्त पडलेले आहेत.

पान ६४ मध्यें श्लोक १३ असें दोनदां पडलें आहे त्या ठिकाणीं १२ व १३ असें पाहिजे.

# प्रस्तावना.

( चाल १. )

अंत नाहीं तुझ्या गूणाला, कितीही केला, अपुरा राहीला। पोवाडा जो जो तुझा झाला। जो जो कुणि कशाहि कविनं केला। जो जो वा होइल पुढच्या काळाला ॥

ब० ग० खापर्डे.

# दुसऱ्या आवृत्तीचें निवेदन.

इतक्यांत ह्या पोवाड्याची पहिली आवृत्ति सबंध संपून दुसरी छापवावी लागत आहे; त्याने मनाला फार आनंद होतो.

पोवाड्याच्या चालींचें कोष्टक ह्या आवृत्तींतहि कायम ठेविलें आहे, पण कोणती चाल " कोठील " आहे तें सदर ह्या खेपेस गाळलें आहे. तसेंच, पोवाडा ह्मणतांना प्रत्येक चौकाच्या प्रारंभीं सांगण्यासाठीं त्याचा थोडक्यांत सारांश ह्या आवृत्तीस जोडण्याची सूचना मला करण्यांत आल्यामुळे, ह्या खेपेस त्याप्रमाणे सोबत सारांश जोडला आहे. येवढाच फरक ह्या आवृत्तींत करण्यांत आला आहे.

हा पोवाडा ह्मटला गेला तेथे तेथे लोकांना आवडल्याचें आढळून आलें. त्याला इंदूरच्या महाराष्ट्र-ग्रंथोत्तेजक-मंडळाकडून २५ रु० बक्षीस, व पुण्याच्या डेक्कन व्हरनॅक्युलर ट्रान्सलेशन-सोसायटीकडून प्रशस्तिपत्र, मिळालें. श्री० मुळे ह्यांनी तर हा पोवाडा जागोजाग ह्मटलाच, पण परतवाडा [ एलिचपूर कँप्, वऱ्हाड ] येथील उत्साही कार्यकर्ते डॉ० गणेश मार्तंड पिंपरकर ह्यांनी केवळ हौसेने तो अनेक जागीं ह्मटल्यामुळेहि हजारो अधिक लोकांच्या कानावर तो गेला.

ह्या इतक्या सर्व शिवनामस्मरणाने ह्या पोवाड्याच्या कर्त्याला, हा पोवाडा ह्मणणारांना, व तो ऐकणारांनाहि, खास जें पुण्य घडलें असेल, तें सर्व हल्लींच्या स्वराज्याच्या चळवळीला अर्पण असो ! व देव पुढेहि हें पुण्य आह्मां सर्वांकडून अधिकाधिक घडवो !

उमरावती [ वऱ्हाड ],
आषाढ शुद्ध २,
शके १८५२.

ब० ग० खापर्डे.

# पहिल्या आवृत्तीचें निवेदन.

पोवाडे करण्याची पुष्कळ दिवसांपासून इच्छा होती, पण चाली येत नसल्यामुळें नडत असे. इ० स० १९२८ सालीं श्री० अ० वि० मुळे उमरावतीस आले, तेव्हां बहुतेक चाली ऐकावयासहि मिळाल्या, व त्या मुद्दाम शिकूनहि घेतल्या. नंतर बाकीच्या चाली गोळा केल्या, व ह्या भांडवलाच्या बळावर दोन-तीन नव्याहि बसविल्या, व ह्या पोवाड्याबरोबर श्री० मुळे ह्यांस पुढें सुमारें महिन्या-दीड महिन्यानेंच त्यांतील एक-दोन ह्मणण्याच्या दृष्टीनें बसवूनहि दिल्या. पोवाड्यांचें हल्लीं नव्या धर्तीवर पुनरुज्जीवन होत आहे ही फार आनंदाची व सर्व दृष्टींनीं इष्ट अशी गोष्ट आहे. अर्थात् नव्या नव्या चालीहि आतां पोवाड्यांत ह्यापुढें निर्माण, व अन्तर्भूत, होण्याचा संभव अधिक आहे. पण पोवाड्याविषयीं आस्था बाळगणारांस आजच्या तरी सर्व प्रचलित चालींची माहिती व्हावी, ह्मणून त्या सर्व चालींचें वर्गवारीनें व क्रमांकवारीनें कोष्टक करण्याचें एक आजवर व्हावयाचें राहिलेलें कामहि करण्याचा मीं प्रयत्न केला आहे, व तें कोष्टक सोबत पुढील पानावर दिलें आहे.

उमरावती ( वऱ्हाड ),
श्रीशिवजयन्ति,
फाल्गुन व॥ ३, शके १८५० ( शुद्ध पं० ).

ब० ग० खापर्डे.

# पोवाड्यांतील चालींचें कोष्टक.

| क्रमांक. | चालीचें नांव. | उदाहरणाचा चरण. |
|---|---|---|
| १ | मोठी चाल. | " धन्य धन्य शहाजि नरवीर. " |
| १अ. | पेशव्याची चाल. | " श्रीमंत पेशवे सवाइ माधवराव. " |
| २ | धावती धाटणी. | " काय बैठक रावसाहेबाचि पानविड मजा खायाचि ॥ " |
| ,, | निजामशाही धाटणी. | " निजामशाहि राज्य बुडवून (हो) । असा चंग बांधला त्यानं ॥ " |
| ,, | पूर्णचंद्राची धाटणी. | " जशा कळा पूर्णचंद्रास । तसा सिंह वाढतो दिसादीस ॥ " |
| ,, | दरबारची धाटणी. | " बादशहानें भरवला दरबार । शहाजिला दिला अधिकार ॥ " |
| ,, | विजापुरची धाटणी. | " विजापुरीं सरदार कोण कोण । त्याचा ठाव काढला शहाजीनं ॥ " |
| ,, | कृष्णावताराची धाटणी. | " रंपका कृष्ण-अवतार । माजला कली अनिवार ॥ " |
| ,, | नाटकाची धाटणी. | " नाटकात नाटक सौभद्र । हावभाव रघूविर सावकार ॥ " |
| ३ | एकछत्राची चाल. | " एकछत्र करुन गेले राव माधवराव । |
| ४ | भिवरेची चाल. | " भिवरेवर पडला तळ, रयत तळमळ. " |
| ५ | दोनप्रहरची चाल. | " दोनप्रहर युद्ध निकरानं केलं, पण कोणि हटे ना कोणाला ॥ " |
| ६ | ब्रह्मवंशींची चाल. | " ब्रह्मवंशि तेजोराशि धन्य बाजीराव. " |
| ७ | जरिपटक्याची चाल. | " जरिपटका वरीं फडफडे, तोफ गडबडे. " |
| ८ | स्वस्तिकाची चाल. | " मांडुनि स्वस्तिक सुवर्णपाट, अडणीवर सोन्याचें ताट. " |
| ९ | सूर्याजीची चाल. | " गवतास आग काविली, सूर्याजी बळी, दुणे शिवाजीला (हो)। वळेल महाराजाला ॥ " |
| १० | श्रीरंगाची चाल. | " जसा रंग श्रीरंग खेळले. " |
| ११ | पगडीची चाल. | " कंगणिदार भरजरी रायाच्या पगडि शिरावर. " |

# पोवाड्याचा सारांश.

चौक १ ला.—कृष्णाकांठी असलेल्या अफजुलखानाच्या जहागिरीला शिवाजीमहाराजांच्या "पुंडाव्या"-चा फार त्रास होऊं लागल्यामुळें खानाने विजापुरास जाऊन बादशहाची आई "बडी-साहेबीण" हिच्याकडून बादशहाला शिवाजीवर स्वारी करण्यास सांगविलें. बादशहाने ह्या कामासाठी दरबार भरविला, पण महाराजांच्या धाकाने कोणीहि सरदार ह्या स्वारीचें कामच अंगावर घेईना! तेव्हा, अफजुलखानाला स्वतःलाच तें काम पत्करून दरबारची अब्रू वाचवावी लागली. बादशहाला त्यामुळे फार आनंद होऊन त्याने मोठा लवाजमा बरोबर देऊन मोठ्या इतमामाने अफजुलखानाची शिवाजीवर रवानगी केली.

चौक २ रा.—खान स्वारीवर जावयाचें ह्मणून आपल्या गुरूचें दर्शन घ्यावयाला गेला. गुरु त्याला ह्मणाला, "तुला शिरच नाही! लढतोस कशाला?" खान ह्या त्याच्या बोलण्याने गडबडला. खानाला त्रेसष्ट बायका होत्या. त्या सर्वांना मारून, निरवानिरव करून तो निघाला व तोरव्याला आला. तेथे त्याचा निशाणाचा हत्ती मेला, व निशाणाची काठी मोडली. हे सर्वांना भयंकर अपशकून वाटले.

चौक ३ रा.—समर्थ रामदासांना अंतर्ज्ञानाने कळलें कीं, विजापूरदरबारने शिवाजीराजांवर फौज व सरदार पाठविला आहे. त्यांनी लागलीच महाराजांना असें एक ओवीबद्ध पत्र लिहिलें कीं, त्यांत, सरळ वाचलें तर, साधा नेहमीचा उपदेश दिसावा, व प्रत्येक ओळीचें पहिलें-पहिलें अक्षर घेऊन वाचलें तर " विजापूरचा सरदार निघाला आहे " हा मजकूर तयार व्हावा. शहाजीमहाराजां-कडूनहि वरील बातमी शिवाजीराजांस कळली. तेव्हा राजांनी आपल्या मातुःश्रींच्या सल्ल्याप्रमाणें पत्रें पाठवून आपल्या सर्व साह्यकर्त्यां-ची एक सभा बोलावली; व त्या सभेंत ठरलें कीं, खानाशी गनीमी काव्याने लढावें, व महाराजांनी प्रतापगडावर जाऊन बसावें.

चौक ४ था.—खानाने वतनें, जहागिरी, पैसा, मानमरातब, वगैरेंची खैरात मांडून त्या बळावर सबंध वाईप्रान्त वश करून घेण्याचा घाट घातला. पुष्कळ लोक त्याच्याकडे वळले. पण कारीच्या देशमुखाचा भाऊ कान्होजीनाईक हा वळला नाही इतकेंच नाही, तर त्याने खटपट करून इतर देशमुख महाराजांकडे आणले. महाराज प्रतापगडावर गेल्यामुळें खानाने पुण्याची वाट सोडली व तो वाईला येऊन बसला.

चौक ५ वा.—पण तो एकंदर प्रदेश व ती परिस्थिति पाहून, लढाईने हें काम जमण्याजोगें नाही हें लक्षांत येऊन, कपटानेच कार्य साधण्याचा खानाचा मूळ निश्चय जास्त दृढ झाला. त्याने कृष्णाजी भास्कर ह्या वकीलाबरोबर महाराजांना मोठा मायावी निरोप पाठविला, व त्यांना विश्वास दाखवून भेटीस बोलाविलें. महाराजांनी त्याचें कपट ओळखलें. त्यांनीहि पंताजी गोपीनाथ हा आपला वकील खानाकडे पाठविला, व मुद्दाम भेटीला येण्याचें कबूलहि

केलें. खानाला फार आनंद झाला. महाराजांनी कोयनाकाठीं पारगांवास खानाला मोठा सुंदर तळ उतरण्यासाठी बांधून दिला; व त्याच्या--आपल्या भेटीसाठी एक मंडप उभारून, तो सुंदर शृंगारून खानाच्या वकीलाकडून भेटीची ती जागा मंजूर करवून घेतली.

**चौक ६ वा.**—आज काय होईल व काय नाही ह्याचा नेम नसल्यामुळे महाराजांनी भेटीच्या दिवशी पहाटेंच उठून देवपूजा वगैरे करून सर्व निरवानिरव केली, अखेरचा दानधर्म केला, व मातेचा निरोप घेऊन ते खाली येण्यास निघाले तेव्हा गडावरच्या सर्व लोकांना त्यांनी गोळा करून निक्षून सांगितलें कीं, मी परत नच आलों तर माझा पुतण्या उमाजी ह्याच्या नांवाने काम चालवा, पण स्वराज्याचा प्रयत्न सोडू नका. महाराजांनी बंदोबस्ताने सर्व पोषाख केला होता. डोंगरावर सगळीकडे झाडींत मावळे लपवून ठेविले, व मंडपांत दंगा झाला तर हल्ला करण्याबद्दल त्यांना इशारतीच्या खुणा पटवून ठेवून त्या खुणा करण्याचा बंदोबस्त केला. खानाने कपट केलेंच. व महाराजांना त्याच्याशी झटापट करून त्याला भवानी तरवारीने यमसदनास पाठवावें लागलें. अर्थात् ठराविक खुणा झाल्या. व त्या होतांच मराठ्यांनी भयंकर कांडगेतोड करून खानाची सर्व फौज पांच प्रहरांत नेस्तनाबूद केली! व जंगी लूटहि मिळाविली. विजापूरला हाहाःकार झाला.

**चौक ७ वा.**—महाराजांचें माहात्म्य. त्यांचा दरारा. त्यांचें वैशिष्ट्य. त्यांनी व समर्थांनी केलेला कर्मयोगाचा उद्धार. महाराजांचा धावा. कवनकाराची त्यांस अखेरची विनवणी. कवनकाराचें नांव वगैरे.

---

# अफजुल-वधाचा पोवाडा.

( चाल १; “ धन्य धन्य शहाजि नरवीर० ” )

नरहरिनं हिरण्यकश्यपुला, कृष्णानं कंसाला, भीमानं जरा-संधाला । धरूनि जसा चिरुनि उभा मारिला । चिरुनिया दुष्ट दंडियेला । शिवाजिनं मारिलं तसंच अफजुल्लाला ॥ ध्रु० ॥

स्वराज्याचा दिवा हो लाविला, त्याला फुंकायाला, बांधुन कमरेला । दुष्ट मोठा धावुन जोरानं आला । शिवाजिनं मानेशींच तोडिला । तोंडांतला वारा तोंडिं राहिला ॥

शिवाजिनं मुलुख मारुन, बंडाळि मांडुन, केलं हैराण । विजा-पुर-दरबार त्रस्त झाला । हाक नित मारितसे अल्लाला। सोडवि न कोणि परी त्याला ॥

( चाल २; “ निजामशाही ” धाटणी. )

होति हो जहागिर मोठी । अफ्जुल्खानाची कृष्णेच्या काठीं ॥
शिवाजिची सदा रेटारेटी । मोठि चाले तिथें कुटाकूटी ॥
जीव नकोसा झाला खानाला । कसं टाळूं अशा ह्या त्रासाला ॥
दम नाकामधिं त्याचा आला । जीव त्याचा त्रासुनशानि गेला ॥
येक जुगत् सुचलि खानाला । विजापुरा खान तो गेला ॥
त्यानं सांगित्लं बड्या साहेबिणिला ।‘ हा शिवाजि लइच माजला ॥
ह्याचा पाहिजे बंदोबस्त केला । येखान् दिवशीं घेइल जीवाला ॥
सांगा सांगा तुह्मी अलिशहाला । अरे झोंपि कसा रे तूं गेला ॥

# पोवाड्याचा सारांश.

---

चौक १ ला.—कृष्णाकांठी असलेल्या अफजुलखानाच्या जहागिरीला शिवाजीमहाराजांच्या "पुंडाव्या"-चा फार त्रास होऊं लागल्यामुळें खानानें विजापुरास जाऊन बादशहाची आई "बडी-साहेबीण" हिच्याकडून बादशहाला शिवाजीवर स्वारी करण्यास सांगविलें. बादशहानें ह्या कामासाठीं दरबार भरविला, पण महाराजांच्या धाकानें कोणीहि सरदार ह्या स्वारीचें कामच अंगावर घेईना! तेव्हां, अफजुलखानाला स्वतःलाच तें काम पत्करून दरबारची अब्रू वाचवावी लागली. बादशहाला त्यामुळे फार आनंद होऊन त्यानें मोठा लवाजमा बरोबर देऊन मोठ्या इतमामानें अफजुलखानाची शिवाजीवर रवानगी केली.

चौक २ रा.—खान स्वारीवर जावयाचें ह्मणून आपल्या गुरूचें दर्शन घ्यावयाला गेला. गुरु त्याला ह्मणाला, "तुला शिरच नाहीं! लढतोस कशाला?" खान ह्या त्याच्या बोलण्यानें गडबडला. खानाला त्रेसष्ट बायका होत्या. त्या सर्वांना मारून, निरवानिरव करून तो निघाला व तोरव्याला आला. तेथें त्याचा निशाणाचा हत्ती मेला, व निशाणाची काठी मोडली. हे सर्वांना भयंकर अपशकून वाटले.

**चौक ३ रा.**—समर्थ रामदासांना अंतर्ज्ञानाने कळलें कीं, विजापूरदरबारने शिवाजीराजांवर फौज व सरदार पाठविला आहे. त्यांनी लागलीच महाराजांना असें एक ओवीबद्ध पत्र लिहिलें कीं, त्यांत, सरळ वाचलें तर, साधा नेहमीचा उपदेश दिसावा, व प्रत्येक ओळीचें पहिलें-पहिलें अक्षर घेऊन वाचलें तर “ विजापूरचा सरदार निघाला आहे ” हा मजकूर तयार व्हावा. शहाजीमहाराजांकडूनहि वरील बातमी शिवाजीराजांस कळली. तेव्हा राजांनी आपल्या मातु:श्रींच्या सल्ल्याप्रमाणें पत्रें पाठवून आपल्या सर्व साह्यकर्त्यांची एक सभा बोलावली; व त्या सभेंत ठरलें कीं, खानाशी गनीमी काव्याने लढावें, व महाराजांनी प्रतापगडावर जाऊन बसावें.

**चौक ४ था.**—खानाने वतनें, जहागिरी, पैसा, मानमतराब, वगैरेंची खैरात मांडून त्या बळावर सबंध वाईप्रान्त वश करून घेण्याचा घाट घातला. पुष्कळ लोक त्याच्याकडे वळले. पण कारीच्या देशमुखाचा भाऊ कान्होजीनाईक हा वळला नाही इतकेंच नाही, तर त्याने खटपट करून इतर देशमुख महाराजांकडे आणले. महाराज प्रतापगडावर गेल्यामुळें खानाने पुण्याची वाट सोडली व तो वाईला येऊन बसला.

**चौक ५ वा.**—पण तो एकंदर प्रदेश व ती परिस्थिति पाहून, लढाईने हें काम जमण्याजोगें नाही हें लक्षांत येऊन, कपटानेच कार्य साधण्याचा खानाचा मूळ निश्चय जास्त दृढ झाला. त्याने कृष्णाजी भास्कर ह्या वकीलाबरोबर महाराजांना मोठा मायावी निरोप पाठविला, व त्यांना विश्वास दाखवून भेटीस बोलाविलें. महाराजांनी त्याचें कपट ओळखलें. त्यांनीहि पंताजी गोपीनाथ हा आपला वकील खानाकडे पाठविला, व मुद्दाम भेटीला येण्याचें कबूलहि

केलें. खानाला फार आनंद झाला. महाराजांनी कोयनाकाठीं पार-गांवास खानाला मोठा सुंदर तळ उतरण्यासाठी बांधून दिला; व त्याच्या--आपल्या भेटीसाठी एक मंडप उभारून, तो सुंदर शृंगारून खानाच्या वकीलाकडून भेटीची ती जागा मंजूर करवून घेतली.

**चौक ६ वा.**—आज काय होईल व काय नाही ह्याचा नेम नसल्यामुळे महाराजांनी भेटीच्या दिवशी पहाटेंच उठून देवपूजा वगैरे करून सर्व निरवानिरव केली, अखेरचा दानधर्म केला, व मातेचा निरोप घेऊन ते खाली येण्यास निघाले तेव्हा गडावरच्या सर्व लोकांना त्यांनी गोळा करून निक्षून सांगितलें कीं, मी परत नच आलों तर माझा पुतण्या उमाजी ह्याच्या नांवाने काम चालवा, पण स्वराज्याचा प्रयत्न सोडू नका. महाराजांनी बंदोबस्ताने सर्व पोषाख केला होता. डोंगरावर सगळीकडे झाडींत मावळे लपवून ठेविले, व मंडपांत दंगा झाला तर हल्ला करण्याबद्दल त्यांना इशारतीच्या खुणा पटवून ठेवून त्या खुणा करण्याचा बंदोबस्त केला. खानाने कपट केलेंच. व महाराजांना त्याच्याशी झटापट करून त्याला भवानी तरवारीने यमसदनास पाठवावें लागलें. अर्थात् ठराविक खुणा झाल्या. व त्या होतांच मराठ्यांनी भयंकर कांडगेतोड करून खानाची सर्व फौज पांच प्रहरांत नेस्तनाबूद केली! व जंगी लूटहि मिळाविली. विजापूरला हाहा:कार झाला.

**चौक ७ वा.**—महाराजांचें माहात्म्य. त्यांचा दरारा. त्यांचें वैशिष्ट्य. त्यांनी व समर्थांनी केलेला कर्मयोगाचा उद्धार. महाराजांचा धावा. कवनकाराची त्यांस अखेरची विनवणी. कवनकाराचें नांव वगैरे.

८२४६

# अफजुल-वधाचा पोवाडा.

( चाल १; " धन्य धन्य शहाजि नरवीर० " )

नरहरिनं हिरण्यकश्यपुला, कृष्णानं कंसाला, भीमानं जरा-संधाला । धरुनि जसा चिरुनि उभा मारिला । चिरुनिया दुष्ट दंडियेला । शिवाजिनं मारिलं तसंच अफजुल्लाला ॥ धृ० ॥

स्वराज्याचा दिवा हो लाविला, त्याला फुंकायाला, बांधुन कमरेला । दुष्ट मोठा धावुन जोरानं आला । शिवाजिनं मानेशींच तोडिला । तोंडांतला वारा तोंडिं राहिला ॥

शिवाजिनं मुलुख मारुन, बंडाळि मांडुन, केलं हैराण । विजा-पुर-दरबार त्रस्त झाला । हाक नित मारितसे अल्लाला । सोडवि न कोणि परी त्याला ॥

( चाल २; " निजामशाही " धाटणी. )

होति हो जहागिर मोठी । अफ्जुल्खानाचि कृष्णेच्या काठीं ॥
शिवाजिची सदा रेटारेटी । मोठि चाले तिथें कुटाकुटी ॥
जीव नकोसा झाला खानाला । कसं टाळूं अशा ह्या त्रासाला ॥
दम नाकामधिं त्याचा आला । जीव त्याचा त्रासुनशानि गेला ॥
येक जुगत् सुचलि खानाला । विजापुरा खान तो गेला ॥
त्यानं सांगित्लं बड्या साहेबिणिला । ' हा शिवाजि लइच माजला ॥
ह्याचा पाहिजे बंदोबस्त केला । येखान् दिवशीं घेइल जीवाला ॥
सांगा सांगा तुह्मी अलिशहाला । अरे झोंपि कसा रे तूं गेला ॥

तो शत्रु तिकडे माजला । करतोस कशाला राज्याला ' ॥
साहेबिणिनं सांगितूलं शहाला । आलं तें शहाच्या मनाला ॥
मोठा दरबार शहानं भरवीला । बोलाविलं मोठ्या मोठ्या खांला ॥
विचारिलं त्यानं समद्यांला । कोण् जातो अशा समयाला ॥
कोण् जातो शिवाजि जिंकायूला । कोण् जातो शिवाजि हट्वायूला ॥
कोण् जातो शिवाजि मारायूला । कोण् जातो शिवाजि बांधायूला ॥

( चाल २; " दरबार "-ची धाटणी· )

ऐकुनी शहाचा सवाल । आ वासुन समृद बसल ॥
टकमकां पहाति येकमेकां । परि वाचा फुटे ना हो येका ॥
शिवारायाचं नांव ऐकीलं । डोळ्यापुढं काजव चमकल ॥
तोंडचं पाणि पळालं । कितिकांनीं तोंड लपवीलं ॥

( चाल ४; " भिवरेवर पडला तळ० " )

अब्रु गेली दरबाराचि, विजापूराची, अलीशहाचि, कुणी बोले ना ।
मी जातों शिवाजिवर ह्मणुन्, मिशी वर पिळुन्, कोणि उभं होइ ना ॥

( चाल २; धावती धाटणी. )

शहा लाल रागानं झाला । आलि चीड फार खानाला ॥
अफजुलखान उठून गर्जला । जिंकील मर्द हा त्याला ॥
आण्तो जिता धरुन शिवाजिला । कर्तो बंद पिंजऱ्यांत् त्याला ॥
माकडावाणि आण्तो दावायूला । थोड्या दिसांत ह्या दरबाराला ॥

( चाल ६; कटाव; " ब्रह्मवंशीं० "-सारखी. )

झाला बादशहा खुष, झाले दरबारी खुष, बडी साहेबिण खुष,
अफजुलखानाला । नव्हतं भविष्य ठाउक कोणाला । कोणाला हो ।
बसला नशीबाचा भला डोला ॥

---

१, मध्येंच एकदां, किंवा शेवटीं एकदां, ह्मणण्यासाठीं पाठभेद—शिवाजिचा.

केला मोठा मानपान, दिलं तरवारीचं पान, केला सेनापति जाण, अफ्ज़ुल्खानाला । नव्हतं भविष्य०........ ॥
दिलं सैन्य हाताखालीं, दोन वर्षं बेगमी दिली । स्वारी रवानावि केली, लढायाला । नव्हतं भविष्य०........ ॥
चौक पहिला ॥ १ ॥

## २.

( चाल ४; " दोन प्रहर युद्ध निकरानं केलं० " )

गुरुदर्शन घ्याया खान जाय पण - प्रकार विपरित झाला ॥
वली गुरू एक फकीर, अफ्ज़ुल्खान - त्याचा होता चेला ॥
मोहिमेला जायासाठिं गुरूचं - दर्शन घ्याया खान गेला ॥
पाहून त्याला गुरु ह्मणे "नाहिं शिर - तुला लढशि काशाला?" ॥
ऐकून खानाच्या मनाला धक्का - फारच एकदम बसला ॥
अपशकून लई हा मोठाच झाला, - कांहिं सुचे ना खानाला ॥
तिरुसष्ट बायका होत्या खानाला, - त्यानं मारिलं समद्यांला ॥
अफ्ज़ल्पुरीं तळयाशीं नेउन् जळीं त्यानं - साऱ्या त्या बुडविल्या ॥
आकांत काय सांगु हो तयांचा, - होतो जिवं गलबला ॥
अठवला जरी तो प्रसंग होतो - जीव कसा कावला ॥
तेथुन् निघुन् तोरव्यावरीं खान ये - पहिल्या मुक्कामाला ॥
तिथें हात्ति निशाणाचा विशाळ त्याचा - पडून एकदम् मेला ॥
काठि निशाणाचि मोडली, निशाण तें - पडलं हो धरणिला ॥
अपशकुन तरी देवानं द्यावे किति, - सीमा काय् नाहिं त्याला ॥

( चाल १. )

परोपरीं सुचवि कंसारी, गोष्ट होणारी, ऐकायाचि तरी । बुद्धि परी कुठें असे मनुजाला । काय हो हरी करिल तो त्याला अफ्ज़ुल्खान् अशा गुणानं ठार मेला ॥ चौक दुसरा ॥ २ ॥

## ३.

( चाल १. )

तो संतकुळाचा मणी, साधु राजकारणि, मुक्त धोरणी । गहन तपोवनीं प्रार्थि रामाला । आनंदवनभुवन राष्ट्र करण्याला असा तो समर्थ रामदास झाला ॥

( चाल २; "विजापुर"-ची धाटणी. )

काननीं गहन बैसून । लाविलं त्यानं हो ध्यान ॥
आधारच जो स्वराज्याचा । आधार मायभूमीचा ॥
आधार हिंदुधर्माचा । आधार गोरगरीबांचा ॥
आधार दीनदुबळ्यांचा । आधार त्रस्त जीवांचा ॥
तो थोर शिवाजीराजा । होता हो शिष्य प्रिय त्याचा ॥
लाविलं ध्यान समर्थानं । पाहिलं दिव्य दृष्टीनं ॥
नीघालं मोठं हे सैन्य । शिवाजिवर् विजापुराहून ॥

( चाल २; धावती धाटणी. )

झट् लिही त्याला पत्राला । ओळ्या हो साध्यासुध्या केल्या ॥
गोविलं त्यांत मजकुराला । घेउन् पहिल्या पहिल्या अक्षराला ॥
'विजापुराचा सरदार नीघाला । त्वां पाहिजे गुप्त सला केला'॥
शिववानं वंदिलं पत्राला । घेतलं मस्तकीं त्याला ॥
गुरुप्रेमानं राजा गहिवरला । शत्रुवर फार कोपला ॥
शहाजिचा निरोपबी आला । कळविलं ह्याच बातमीला ॥
सला त्यानंबि हाच होता दीला । राजाला हुरुप मोठा आला ॥
मातृभक्त थोर तो राजा । दाविलीं पत्रं मातेला ॥
कौसल्या ती कलियुगांतली । कीं यशोदा गोकुळांतली ॥
पत्र पाहुन् फार गहिवरली । पण् आसवं तिनं आवरलीं ॥

किति झालं माता ती ठरली । चिंता मनीं पुत्राची पडली ॥
परि मोठ्या धिराचि माऊली । होति स्वराज्याचि साऊली ॥
राजकाजांत होति कसलेली । धीर धरुन पुत्राला बोलली ॥
‘ पाहिजे समदि बोलावीली । मंडळी येथं आपुली ’ ॥
शिवाजिनं पत्रं पाठवीलीं । मंडळी समदि जमवीली ॥

( चाल ३; “ एकछत्र करुन गेले० ” )

शामराजपंत, रघुनाथपंत, सबनीस ।
अण्णाजिपंत, गंगाजि मंगाजि वांकनीस ॥
सोनाजिपंत डबीर, नारो हणमन्ते ।
निळोपंत मुजुमदार, जिवाजिबा दवकान्ते ॥
सुभानजीनाइक, गोमाजि पानसंबळ ।
चतुर तो उपाध्या, कृष्णाजि पानसंबळ ॥
माणकोजी दहातोंडे, सुभानजी इंगळे ।
सर्नोबत् नेताजी, मोरोपंत पिंगळे ॥
ब्राह्मण सेनापति नारायणवी भले ।
सारे होते लोक ते किती प्रसंग पाहिलेले ॥
शहाजिच्या तालमीमंधि तयार झालेले ।
जिजाबाइच्या धोरणी दृष्टिमंधीं वाढलेले ॥
स्वराज्याची उषा मनांमधीं गोड पहाणारे ।
ती पहाट फुटुनशान् मनं रंगून गेलेले ॥
अति गुणी, तसेच ईमानी, शूर रणधीर ।
होते मोठे धोरणी, तसेच बाके लढणार ॥

( चाल २; “ विजापुर ”-ची धाटणी. )

मनसुबा त्यांनिं बसुन केला । देउं नये लढाइ खानाला ॥
तीस हजार फौज खानाची । दहा हजार नाहिं पुरती आमुची ॥
बचावाचं धोरण अपण् घ्यावं । आडरानांत् खानाला खेचावं ॥

प्रतापगडा धरुन बसावं । महाराजांनीं गडावर रहावं ॥
आडवाटेंत खान अडकेल । बोक्याचानीं मग गवसेल ॥
मग खुशाल करावि लांड्गेतोड । दुस्मानांचीं मोडुनशानि हाडं॥
गनिमीच काव्यानं लढावं । खानाचं सैन्य रडवावं ॥
खानाला पुरतं सतावावं । 'तोबा तोबा' कराया लावावं ॥

( चाल ३; "दरबार"-ची धाटणी. )

तो साखर जर पेरील । आपण् अमृत पाहिजे पेरीलं ॥
बोलामधें हटुं नये त्याला । कृतिमधेंहि हरुं नये त्याला ॥
हा गनीम माराया आला । मराठ्यांचं पाणि दावुं त्याला ॥
हा हुषार समजे अपल्याला । मराठ्यांचा कच्का नाहिं पाहिला॥
हा शूर समजे अपल्याला । मराठा रे, नाहिं अजुन् भेट्ला ॥
करूं नको उगा वडवडीला घोडामैदान आहे नजिक् आला ॥

( चाल ४. )

'जय भवानि!' ह्मणुन ऊठले, बाहु फुरफुरले, बंदही तुटले, अंगरख्याचे । उसळलें तेज मराठ्यांचें, दुस्मानाच्या कर्दनकाळांचें ॥

भवानिनं भक्ति पाहुन, सत्व पारखून, यश देऊन, पालवीलं । मराठ्यांचं नांव गाजविलं, डंक्यावर अजुनि जगीं राहिलं ॥
चौक तिसरा ॥ ३ ॥

---

१, पुनः हेच दोन चरण शेवटीं पाठभेद—वडवावं.

## ४.

( चाल ४. )

तोरण्यावरुन नीघाला, खान चालला, लिहुन पत्राला, फोडुं पहातो । मावळखोऱ्यांत पत्रं लीहितो, देशमुख-देशपांडे वळवीतो ॥

( चाल ३. )

खानानं बादशहाला मुद्दाम सांगून ।
घेतलीं बरोबर कितीं कोरिं फर्मानं ॥
शिक्कामोर्तब दरबारिचं त्यांवर घेतलं ।
खानानं त्यांवर कोणाचंबी नांव घातलं ॥
कोणा दिली जहागिर, कोणाला सरदारी ।
देशपांडेपण, कुळकर्णिपण, वतनदारी ॥
खैरात काय बरसात अशी मांडिली ।
पैका मोठी जगांत् खराब चीज ठरली ॥
भिष्माचिही बोबडी पैशानं वळविली ।
कबुलि ही भारतांत् तोंडानं त्यानं दिली ॥
हे तर गरिब, मतलबी, हीन मानव ।
कितिकांचं शील मग तिथें नीट रहावं ॥
पांढरे, इंगळे, काटे, घोरपडे ।
बेद्रे, प्रताप्राव मोरे, ते खराडे ॥
बांदल, पिलाजी, शंकराजि, मोहिते ।
केदाराजि जेधे, खंडोजी खोपडे ॥

( चाल १. )

ज्या निमकहराम् फितुरिनं, स्वजन बुडवून, तसे रडवून, नष्ट केले जाण । आनंदवनभूवन केलं वैराण, सदाची आमूचि दावेदारिण ॥

ती अमुचि उठलि वैरिण, दावा साधुन, नीच फितुरीनं, दिले नेऊन। इतके जण शत्रुला मिळवून, नशिब हें हिंदभूमिचं जाण ॥

( चाल २; " कृष्णावतारा "-ची धाटणी. )

सारे परी नीच नसतात। ह्मणुनि हें जग चालत ॥
भाउ केदाराजि जेध्याचा। कान्होजिनाइक नांवाचा ॥
होता देशमूख कारीचा। होता सच्चा तो इमानाचा ॥
होता पक्का तो शब्दाचा। होता शिपाइ तो स्वराज्याचा ॥

(चाल २; " दरबार "-ची धाटणी.)

त्यानं सांगितलं साफ भावाला। 'नाहिं येणार खानाच्या बाजूला॥
खान स्वर्ग काय देईल ?। काय इथें दळिंद्र येईल ? ॥
नर्काचा रस्ता तुह्मिं धरिला। आह्मि पाहूं स्वराज्य-देवाला ॥
आह्मि रक्षुं अपुल्या धर्माला। हे प्राण दिले शिवाजीला ' ॥
शिवाजिच्याकडे तो राहीला। वळविलं समद्या देशमुखांला ॥
अवसान् दुपट् आलं शिवाजीला। प्यार तो त्याला फार झाला॥
प्रतापगडाकडे राजा वळला। खान् सोडी पुण्याच्या रोखाला॥
गांठायाला प्रतापगडाला। खान् वाईवर येउन् बसला ॥

( चाल १. )

आलि खडाजंगिची वेळ, दोघेहि सबळ, आपुलालं दळ। घेउन ठाकले समोर युद्धाला। पाणि नाहिं राहिलं प्रजेच्या तोंडाला। कौतुक झालं स्वर्गिं देवांला ॥ चौक चवथा ॥ ४ ॥

## ५.

( चाल १. )

डोंगर कठिण पाहिला, मनामधिं भ्याला, फिरे रानाला ।
काळावाणी प्रतापगड पाहिला । मराठा तशांत समोर लढायाला ।
लढाइचा बेत खानानं सोडिला ॥
वेळ ही फजीतिचि साची, प्रतिज्ञा दरबारिंची, खोटि व्हायाचि ।
शिवाजी मुसक्या बांधुन आणायाची । होति जी मूळ बुद्धि कपटाची । पाळि ती होय पुन्हां खानाची ॥

( चाल ३. )

कृष्णाजि भास्करा वकिल ह्मणुन धाडिलं ।
मायावी निरोपा खानानं पाठविलं ॥
'अहो, राजा शहाजी जिगरदोस्त आमुचा ।
दरबारांत नाहिं दुजा दोस्त असा कुणि माझा ॥
बेटा! बेटा! शिवाजीराजा! चुलता मी तुझा ।
काकाला येउन् ह्या भेट, हेत फार माझा ॥
भिउं नको, नाहिं मी नाशाला तुझ्या आलों ।
दरबाराचा-तुझा दोस्ताना कराया पातलों ॥
कधिं येतो भेटिला, सांग माझ्या वकिलाला ।
गोष्ट असे साधि, ये, भेट तुझ्या काकाला' ॥

( चाल ४. )

शिवाजिनं कपट वळखुन, विचार करुन, धोरण बांधून, पंताजि गोपिनाथ । वकिल पाठवि खानाच्या गोटांत, कराया चोरावरतिबी मात ॥

( चाल ३. )

भेटाया जायाचं शिवाजिनं कबुल केलं ।
खानाला वाटलं सावज गवसलं ॥

खान मोठा खुषीनं हरीखून तो गेला ।
शक्तिचा आपल्या गर्व मोठा खानाला ॥
आलाच हातिं शीवाजि वाटलं त्याला ।
साफसफा करुन शिवाजिनं रस्ता त्याला दिला ॥
पण येकच ठेविली वाट, बाकि बुजाविल्या ।
मोठं शिबिर बांधिलं कोयनेच्या तीराला ॥
पारगांवीं दुकानं लाविलिं नानापरीं ।
नाहिं उणं केलं शिवाजिनं कांहिं पाहुण्चारीं ॥
भेटिसाठिं मंडप शिवाजिनं करविला ।
तो पसंत झाला खानाच्या वकिलाला ॥
मखमली गालिचे, किनखापी छत त्याला ।
मोत्याच्या झालरी, थाट फार तो केला ॥
पारगांवीं खान तो येऊन राहिला ।
फार उत्सुक झाला शिवाजिला भेटायाला ॥

( चाल १. )

चालला अपुल्या पायानं, ओढिला काळानं, ओढिला देवानं । दुष्ट तो दंड पुरा करण्याला । स्वराज्याचा दिवा जळत ठेवायाला । हिंदुचं नांव जगीं राखायाला ॥

लोक ते नवस करिती, धाव रमापति, अमुचा छत्रपति । राखि सुखि इडापिडा टळुनिया । विजयि तो युद्धिं होउनीया । कलीजा तो अमुचा वांचुनीया ॥

देवा ! दे अमुचं औक्ष त्याला, शिवाजिराजाला, पालनवाला । आलम् दुनियेला दयाळु झाला । देवानं त्राता पाठवीला । आमुचं दे देवा ! औक्ष त्याला ॥

जप-तप-होम-अभिषेक, करिती कित्येक, मागती एक । औक्ष दे अमुच्या शिवाजिराजाला । एकला अमुचा पालनवाला । स्वधर्माला तसाच पहा स्वराज्याला ॥ चौक पांचवा ॥ ५ ॥

मन.वा 2030



## ६.

( चाल १. )

पंधराशें एक्यैंशि शकांत, मार्गशीर्षांत, सप्तमी शुद्ध। होता त्या रोजिं पहा गुरुवार। आज ती भेट भयंकर होणार। देवा रे ! कोण आज जिंतणार ?॥

तो दिवस भयंकर फार, तव्हा घरोघर, पुशिति तरवार। युद्ध घनघोर आज होणार। कितीकांचं औक्ष आज सरणार। एखांदा हसल्, बाकि रडणार॥

तांबडं पहाटें फूटलं, देव-दैत्यांतलं, युद्ध नभिं झालं। रक्त सांडलं त्यानं रंगलं। गगनमंडळ लाल झालं। असंच त्या दिवशिं मना भासलं॥

( चाल २. )

मोठ्या प्रभातकाळीं राजा तो ऊठला।
स्नान करुन भक्तिनं पूजी तो शंभुला॥
भवानिला प्रार्थुनी, वंदी तो मातेला।
काय होणार आज हें ठाउक एक देवाला॥
निरवानिरव करुन सर्वांचा निरोप घेतला।
सइबाईचि अठवण झाली हो राजाला॥
नुकति मरुन दोन महिनेच काळ लोटला।
राजा सिंह छातिचा तसाच दाबि मनाला॥
राजा असुन मन जिंकुन योगि तो झाला।
कालिमधें जनक हा दुजा होउनी गेला॥
दानधर्म अखेरचा राजानं सारा केला।
काय झालं तव्हा जिजाबाईच्या मनाला॥

हें सांगल अशी दिलि वाणि देवानं कोणाला ? ।
गोळा केलं गडाच्या समूद्याशी लोकांला ॥
उभा राहुन सिंह तो गर्जून बोलला ।
आज होणार काय हें ठाउक एक देवाला ॥
जर नाहीं पुन्हां हा शिवाजि तुह्मां दीसला ।
तरि चुकूं नका पण तुह्मी अपुल्या कामाला ॥
बाळ हा उमाजी, नांव ह्याचं पुढं घाला ।
तुह्मी लढा, मरा, पण सोडु नका धर्माला ॥
हिंदवी स्वराज्याचा डोलारा मांडिला ।
हा तुह्मी शिवाजी बनुन् पाहिजे राखिला ॥
शिरिं पगडीखालीं शिरस्त्राण घातलं ।
अंगरख्याच्या आंत चिलखत त्यानं चढविलं ॥
बंदिली भवानि-तलवार, खोंचि कमरेला ।
अस्तनींत पट्टा एक घडिचा ठेविला ॥
घेतली एक कट्यार संगं कमरेला ।
झालि दुपार, राजा खालिं जायाला नीघाला ॥

( चाल २; " पूर्ण चंद्रा "-ची धाटणी. )

संगं घेतलं दोघांला । जिवा ह्माला, संभाजी कावजीला ॥
मावळा बाका लढनेवाला । रानोरानीं लपुन् ठेवीला ॥
मंडपाच्या दारिं शिंगवाला । येक आणुन आधिं ठेवीला ॥
गडावर भरुन तोफेचा । बार ठेविला फक्त काढायाचा ॥
राजा खालीं येउन पोंचला । खान होता आधिंच आलेला ॥
दोन जवान त्याच्याबि सांगातं । वाट पहात होते मंडपांत ॥
राजा आला खानानं पाहीला । बोलाविता आलिंगनाला ॥
खान् पहाड मोठा शरीरानं । राजा पोलाद्, मूर्ति लहान ॥
पण नाहिं सीमा छातीला । खानाला जाउन भेटला ॥

( चाल १; धावती धाटणी. )

खानानं कपट मांडीलं । महाराजांचं मुंड्कं धरीलं ॥
डाव्या खाकेंत धरुन दाबीलं । कट्यारिनं कुशींत मारीलं ॥
होतं चिलखत् झाला बचाव । महाराष्ट्राचा वांचला देव ॥
महाराजांनीं कपट ताडीलं । झट कट्यारिनं भोसकीलं ॥
फाडिली कूस खानाची । आंतडीं बाहेर आलिं त्याचीं ॥
"दगा ! दगा !" खानच ओरडे बा।चोराच्या उलट्या ह्या बोंबा ॥
खानाची पकड ढिलि झाली । महाराजांनिं मान सोडवीली ॥
उडी एकदम् दूर घेतली । भवानी तलवार उपशीली ॥
खानबी जबर तो मोठा । किति लढाया पाहिलेला होता ॥
आंतड्या पोटांत दाबीत । ठेविला त्यांवर येक हात ॥
उजव्या हातानं तरवार काढीली।शिवाजिवर चाल पुन्हां केली ॥
महाराजांनिं चपळाइ केली । अशि भवानि ती चालवीली –॥
जानवं तिरपं कापीलं । खानाचं धड खालिं पडलं ॥

( चाल २; "दरबार"-ची धाटणी. )

धावले खानाचे लोक । धावले शिवाजिचे लोक ॥
कापाकापी जबर माजली । मखमली बिछाइत् भिजली ॥
महाराजांनीं पट्टा काढीला । दुसऱ्या हातीं घेत्‌लं भवानीला ॥
दोहों हातीं लढत चालले । काळावाणी दिसूं लागले ॥
फिरे पट्टा, शिवाजि, तरवार, कोण कुठं ? कसं कळणार ! ॥
झाले तिन्ही जणूं एकरूप । तेजाचा फिरे एक लोट ॥
शत्रुच्या मधें घूसले । वाट काढुन् बाहेर् पातले ॥
दारिच्या शिंगवाल्याला । सांगितलं शिंग फुंकायाला ॥
गरजलं शिंग जोरानं । गर्जलं सारं हो, रान ॥
तें ऐकुन तोफ गडडली । दरीं खोरीं रानं हादरलिं ॥
झाडिच्या बाहेर नीघाले । 'हरहर महादेव !' गर्जले ॥

बोललं सारं तें रान । काळाचं तोंड होऊन ॥
गजबजे पहाड रानोमाळ । फाटलं शत्रुवर आभाळ ॥
मराठ्यांनीं चाल झट् केली । लांड्गेतोड भयंकर केलि ॥
नेस्तनाबूद् फौज खानाची । पांच प्रहरांत केलि हो, साचि ॥
हिरेमाणकं, रोकड, किति गावली। उंट, हत्ति, घोडिं, सांपडलीं॥
महाराजांना लूट लई मिळली । गडावर त्यांनिं ती नेली ॥

( चाल १. )

दुंदुभी गगनिं गरजला, हरिख देवांला, टाकिति पुष्पांला। हरिख झाला समद्या धरित्रीला। अवतरला पालनवाला। दुष्ट तो पुरा दंडियेला ॥

स्वराज्याचा दिवा वांचविला, ज्याला फुंकायाला, अफ्जुला आला। वधुन त्याला हिंदु जिता राखिला। पराक्रम जगांत गाजविला । शिवाजिचा झाला बोलबाला ॥

( चाल ६; कटाव; ' ब्रह्मवेरिं० "-सारखी. )

गेलि खबर् विजापुरांत्, बादशहा होता दरबारांत्, मारी कपाळावर हात्, सोडी आपुलं तख्त्, उठुन गेला जनान्यांत्, किति बसला हो रडत्, त्याला नाहिं सीमा । नाहिं सीमा हो । कळला शिवाजिचा महीमा ॥

बातमि गेली जनान्यांत्, बडीसाहेबिण दांत् खात्, चोळी हातावर हात्, गेलि किंकाळि नभांत्, धरणीवर अंग टाकित्, नाहिं अन्नपाणि घेत्, तीन दिवस असे जात्, किति तळमळे । तळमळे हो । असे पाप देत पडताळे ॥ शोक सहावा ॥ ६ ॥

## ७.

( चाल १. )

औरंगजेब मेटाकुटिं आला, धाक विजापुराला, राखि धर्माला। हिंदवी स्थापि स्वराज्याला। तयार पुन्हां गुरुसि राज्य अर्पायाला। असा तो योगि राजा झाला ॥

काळ झाला येउनी गेला, मूरलीवाला. कर्मयोग मळला। शिवाजि-रामदास घेति जन्माला। कर्मयोग पुन्हां उद्धरीला। धर्म हा पुन्हां जिता केला ॥

कमि नाहीं कधिंहि युक्तिला, तसा शौर्याला, तसा वैराग्याला। नीति पुन्हां सांभाळुनी राहिला। असा सांगा दुजा कोण झाला। तोड जगिं नाहिं शिवाजीला ॥

महिवरीं कितिहि झाले जरी, थोर थोर तरी, शिवाजिचि सरी। कुणालाहि नाहिं कधिंहि येणार। शिवाजि तो शिवाजि सदा रहाणार। दुजा नाहिं असा कधिंहि होणार ॥

संकट आज राष्ट्राला, सुचे न कांहिं त्याला, शोधित मार्गाला। शिवाजिचा दाखला मला अठवला। आणुन तो आहे समोर मांडिला। 'जशाला तसं' तत्व मुळ त्याला ॥

ये रे, ये रे, शिवाजिप्रभु! ये रे, पुन्हां जन्म घे रे, स्वधर्म तारी रे। स्वराज्य पुन्हां आज स्थापुनीया। अह्मांसि पुन्हां तारि, येइ राया!। तुझ्याविण कोण अह्मां जगिं ह्या ॥

ह्मणुनिया शिवाजि! धावुन् ये रे, तूंच अमूचे सारे, बंधु-सोयरे। तुझ्याविण कोणि नाहिं आह्मांला। हांक मग मारु दुजा कोणाला। धरीतों ह्मणुनि तुझ्या पावलां ॥

दिनरातीं आटुनि रक्ताला । पीळ आंतड्याला, सोसुन त्रासाला।
स्वराज्याचा डोंगर उभा केला । तुवां तो अमुच्या हातिं दीला ।
करंटे अह्मि तो गमावीला ॥

अंत माहीं तुझ्या गूणाला, कितीही केला, अपुरा राहीला ।
पोवाडा जो जो तुझा झाला । जो ओ कुणि कशाहि कविनं
केला । जो जो वा होइल पुढच्या काळाला ॥

पोवाडा माझा संपला, कवनकार थकला, गाणारा दमला ।
शेवटीं विनति एक पायांला । पूर्वि तूं जसा अह्मां पावला ।
आज पुन्हां पाव अशा समयाला ॥

माझ सुदाम्याच हे पव्ह, पाखडुनि खाव, कुठं न टोचाव ।
सुजनजन चतुराच्या टाळुला । शिवाजिच्या वंदीतों पावलां ।
पवाडा अर्पीतों हा त्याला ॥

कविभूषण बलवन्तानं, वऱ्हाडि कवीनं, कवन करून । गुंणी
पाहून अनन्तशाहिराला । पोवाडा दिला ह्मणायाला । शिवाजिचं
स्मरणपुण्य साधायाला ॥ चौक सातवा ॥ ७ ॥

———

१, खोडाळा, जि० ठाणें, येथील रहाणारे, व नाशिकच्या “महाराष्ट्र-शाहीरमंडळा”-चे एक प्रमुख कार्यकर्ते, प्रसिद्ध शाहीर श्री० अनंत विष्णु मुळे यांना उद्देशून हा चरण आहे. इतरांनी ह्मणण्यासाठीं पाठभेद—फार प्रेमानं सर्व शाहिरांला ।

समाप्त.

# अखेरची विनवणी.

पोवाडा माझा संपला, कवनकार थकला, गाणारा दमला ।
शेवटीं विनति एक पायांला । पूर्वि तूं जसा अह्मां पावला ।
आज पुन्हां पाव अशा समयाला ॥

REFBK-0004246
REFBK-0004246

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र. ४२४६